K. S. Wani Memorial Trust

# NEWS LETTER

Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.31 / October – December 2025 / K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

## Printing Institute News

### "बोलींचा जागर" महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

१० डिसेंबर २०२५ रोजी भाषा संचालनालय व भाषा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे "मराठी भाषा पंधरवाडा" निमित्ताने "बोलींचा जागर" या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी आभासी बैठक आयोजित केली होती. १७ डिसेंबर २०२५ रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी विभागात दुसरी प्रत्यक्ष बैठक आयोजित केली होती या दोन्ही बैठकींना प्रा. डॉ. शोभा शिंदे यांनी का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे यांचे प्रतिनिधित्व केले याप्रसंगी त्यांनी संस्थेची माहिती व बोलीभाषेवर संस्थेत सुरू असलेल्या प्रकल्पांची व संशोधनाची सविस्तर माहिती दिली.



बैठकींना उपस्थित संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे

### सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांची संस्थेस सदिच्छा भेट

डॉ. किरण कुलकर्णी सचिव मराठी भाषा विभाग तथा सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे संस्थेस सदिच्छा भेट देण्यात आली यावेळी संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे यांनी स्मृती प्रतिष्ठानच्या सर्व प्रकल्पांची माहिती त्यांना दिली. संस्थेचे सर्व प्रकल्प पाहून ते प्रभावित झाले. ग्रंथालयात असलेल्या पुस्तकांची त्यांनी विशेषत्वाने माहिती करून घेतली. डॉ. वाणी यांच्या जीवनावर तयार करण्यात आलेला शुद्ध बीजापोटी हा लघुपट त्यांनी पाहिला. संस्थेचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे मी पुन्हा वेळ काढून संस्थेस निश्चित भेट देईन ते म्हणाले. यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री. जितेंद्र सोनगिरे,प्रशासन प्रमुख सौ वैशाली सोनगिरे, धुळे जिल्हा माध्यमिक विभाग शिक्षण अधिकारी श्री पाटील व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.



संस्थेच्या प्रकल्पाची माहिती करून घेतांना मा. डॉ. किरण कुलकर्णी सर

## मा. देवदत्त पाटील (अमेरिका) यांची संस्थेला भेट

का. स. वाणी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ के.बी. पाटील यांचे अमेरिकास्थित सुपुत्र मा. देवदत्त पाटील यांनी १९ नोव्हेंबर रोजी संस्थेस सदिच्छा भेट दिली तसेच स्मृती प्रतिष्ठान अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांची माहिती घेतली. डॉ वाणी यांनी सुरू केलेल्या प्रकल्पांची व कार्याची व्याप्ती पाहून ते प्रभावित झाले.



संस्थेचे विश्वस्त श्री जितेंद्र सोनगिरे यांनी मा देवदत्त पाटील यांना बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाची माहिती दिली



मा. देवदत्त पाटील यांचे संस्थेत स्वागत करताना संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे

## शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ साठी संस्थेची शिष्यवृत्ती मंजूर

संस्थेमार्फत गरजू गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती यावर्षी देखील देण्यात आली. १९ नोव्हेंबर रोजी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. के. बी. पाटील, सचिव प्रा.डॉ. शोभा शिंदे, विश्वस्त श्री. जितेंद्र सोनगिरे यांच्या उपस्थितीत अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांच्या व त्यांच्या पालकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. पदविका अभ्यासक्रमाच्या दोन्ही वर्गांच्या मिळून एकूण दहा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला यात ०१ लक्ष ०६ हजार रुपये मंजूर करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले असून संस्थेचे आभार व्यक्त केले.

## जागतिक एड्स दिन साजरा

कै. भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय धुळे अंतर्गत जिल्हा एड्स निर्मूलन कक्ष रेड रिबन क्लब व का. स. वाणी संस्था धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून समाज एड्स मुक्त करण्यासाठी शपथ घेतली. तसेच एड्स आजाराविषयी सविस्तर माहिती सांगून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यात आली. एड्स पॉझिटिव्ह रुग्णाला मानसिक आधार द्या व त्याला समाजात मुख्य प्रवाहात सामावून घेतले पाहिजे, असे मत समुपदेशक श्री. बाबाजी पाटील यांनी व्यक्त केले.



समुपदेशक करतांना श्री. बाबाजी पाटील व उपस्थित विद्यार्थी व शिक्षक

## दिवाळीनिमित्त कर्मचाऱ्यांना बोनस व मिठाईचे वाटप

दिवाळी सणाचे औचित्य साधून दरवर्षाप्रमाणे का.स.वाणी मराठी प्रगत संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांना संस्थेच्या वतीने बोनस व मिठाईचे वाटप करून आनंद द्विगुणित करण्यात आला व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. सर्व कर्मचाऱ्यांनी संस्थेचे विश्वस्त व पदाधिकार्यांचे विशेष आभार व्यक्त केले.






## विद्यार्थ्यांची यशोगाथा

मी नितीन नेरकर, राहणार नवापूर जिल्हा नंदुरबार माझ्या वडिलांच्या निधनानंतर मामाचे गाव अकलड (मोराणे) ता. जि. धुळे येथे शिकायला आलो. त्यावेळी आमचे राहायचे स्वतःचे घर नव्हते, दोन वेळेच्या जेवणाची भ्रान्त होती. माझ्या मामांनी मला स्वतःचे घर राहायला दिले व मामा नोकरीसाठी सुरतला गेले. आमचे कुटुंब आई, आजी, माझा लहान भाऊ आम्ही चार जण मामाच्या घरात राहु लागलो.

माझ्या आईने व आजीने लोकांच्या शेतात मोल मजुरी करून आम्हाला शिक्षण दिले. दहावीपर्यंत गावातच शिक्षण घेतले. लहान भावाने बीएससी केमिस्ट्रीमध्ये पदवी पूर्ण केली. आज तो पुण्यात असून महानगरपालिकेत सेफ्टी ऑफिसर म्हणून कार्यरत आहे. अकरावीत शिक्षण घेत असताना सुरतला मामाकडे दोन-तीन महिन्यांसाठी कामाला गेलो. त्यावेळी मला सहा ते सात हजार पगार मिळत असे, कामाचे पैसे कमावून मी पुढील शिक्षण केले. घरची परिस्थिती खूप बेताचीच होती. कोणाचा आम्हाला आधार नव्हता. स्वतःला उभे राहणे भाग होते याप्रसंगी लोकांच्या शेतात कापूस वेचण्यासाठी जावे लागत असे. शेतमजुरीचे पैसे जमवून २०१३ साली बारावीत पास झालो. बारावी नंतर काय करावे हा प्रश्न उभा राहिला, त्यावेळी चेतन ठाकरे हा माझा खूप जवळचा मित्र होता त्याने मला का.स. वाणी संस्थेत दोन वर्षाचा प्रिंटिंग डिप्लोमा कोर्स केल्यानंतर हमखास जॉब मिळतो असे सांगितले. त्याप्रमाणे मी कोर्ससाठी प्रवेश घेतला. मला चेतनची खूप मदत झाली त्यावेळी दहा हजार रुपये प्रवेश घेताना लागत होते, मी माझे काका आत्या व इतर नातेवाईकांकडून पैशांची मागणी केली पण त्यांनी स्पष्ट नकार दिला.

त्यावेळी मला पैशाची किंमत कळाली. मला कोर्स पूर्ण करायचा होता, मी गावातील एका मावशीकडून ५००० रुपये घेतले आणि लगेच का.स. संस्थेत प्रवेश घेण्यासाठी आलो. आल्यानंतर माझे गुरुवर्य प्रा. पुराणिक सरांनी मला कोर्स विषयी पूर्ण माहिती दिली. प्रवेश झाल्यानंतर राहण्याचा प्रश्न निर्माण झाला पण देवाला काळजी, लगेच मावशीने आईला फोन करून सांगितले की दोन वर्षे तुझा मुलगा माझ्याकडे राहील, काही काळजी करू नको. तिथे माझी राहण्याची व जेवणाची व्यवस्था झाली. माझ्या आईने व मावशीने माझ्यासाठी खूप कष्ट घेतले. प्रिंटींग डिप्लोमा अभ्यासक्रम शिकत असताना मी प्रथम क्रमांकाने आणि विशेष प्राविण्याने उतीर्ण झालो. घरातल्या सगळ्यांना आनंद झाला. यावेळी मला प्रा. पुराणिक सर, वांजळे सर, सोनवणे सर, कुलकर्णी मॅडम व बडगुजर सर यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन मिळाले. नंतर खापोली येथे पॅकेजिंग कंपनीत ज्युनिअर सुपरवायझर म्हणून कामाला हजर झालो.

पण मला पुराणिक सर बोलले होते की तू एक दिवस दुबईला जाणार, खरोखर दोन वर्षांनी दुबईला असिस्टंट प्रिंटिंग ऑपरेटर म्हणून सप्टेंबर २०१८ रोजी मोराणे गावातील पहिलाच दुबईला जाणारा मुलगा ठरलो. गेल्या आठ वर्षापासूनमी दुबईला सीनियर प्रिंटींग टेक्निशियन स्पेशलिस्ट म्हणून काम करत आहे. माझी जीवनशैली पूर्णपणे बदलली आहे. याचे सर्व श्रेय माझे गुरु प्रा. पुराणिक सरांना देतो, त्यांनी मला योग्य मार्गदर्शन केले दिशा दाखवली म्हणून मी स्वतःला धन्य समजतो. मी संपूर्ण का.स. वाणी संस्थेचा खूप खूप आभारी आहे.





# रेऊ वाणी विज्ञान विहार

## किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन कार्यक्रम

दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी शेवंती इंग्लिश मीडियम शाळेत इयत्ता सातवी ते दहावीतील मुलींसाठी “कळी उमलतांना” या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात डॉ. दिपाली महाजन यांनी किशोरवयात होणाऱ्या शारीरिक बदलांबाबत सविस्तर माहिती दिली. तर वयात येताना होणाऱ्या मानसिक बदलांशी कसे जुळवून घ्यावे तसेच ताणतणाव व्यवस्थापन कसे करावे याबाबत सौ. वैशाली सोनगिरे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.




## इको-फ्रेंडली आकाश कंदील कार्यशाळा

दिनांक १६ ऑक्टोबर रोजी दरवर्षाप्रमाणे कागदाचे इको-फ्रेंडली आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करावी या उद्देशाने ही कार्यशाळा घेण्यात येते. या कार्यशाळेत वीस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत स्वतःच्या हाताने रंगीबेरंगी कागदी आकाश कंदील तयार केले.





## वाचन संस्कृती आणि आजीवन शिक्षण (शालेय गट)

का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहार आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी 27 नोव्हेंबर 2025 रोजी "वाचन संस्कृती आणि आजीवन शिक्षण" या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा.प्रा.डॉ.सुषमा दाते यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा  सदस्य कबचौ उमवी जळगावचे प्रा.शिवाजी पाटील उपस्थित होते. उद्‌घाटन कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष मा.सी.ए.शशिकांत धामणे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.





या कार्यक्रमाची सुरुवात प्रा.डॉ. सुषमा दाते यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली. त्यांनी 'वाचन एक कला' व शास्त्र या विषयावर बोलतांना ज्या वाचनात मजकुराचा अर्थबोध होतो त्याला खरे वाचन म्हणतात वाचनामुळे व्यक्तीमत्व व भावनांचा विकास होऊन मनावर चांगले संस्कार होतात. वाचनाचे प्रकार,वाचन कसे असावे व कसे असू नये, याबाबत मार्गदर्शन करून मनाच्या पोषणासाठी वाचन खूप महत्वाचे आहे असे सांगत आपल्या मार्गदर्शनाने समारोप केला.




त्यानंतर प्रा. डॉ. ज्योती बोरकर यांनी वाचनाचे फायदे या विषयावर बोलत असतांना त्या म्हणाल्या, वाचनातून परंपरा, मानवाच्या वागण्याचे नियमन, संस्कृतीचे जतन होत असते. त्यानंतर मा. अरुंधती ब्रम्हे यांनी 'मना घडवी संस्कार' या विषयावर मार्गदर्शन केले त्यात त्यांनी दोन पिढीतील दैनंदिनीचा फरक दर्शवून चांगल्या संस्कारासाठी वाचनाचे महत्त्व पटवून दिले.





त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी चित्र पाहून सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण व मार्गदर्शन मा.शंभू पाटील व प्रा.रंजना खैरनार, डॉ. मनीषा भावसार यांनी केले.





मा.शिवाजी पवार यांनी स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी 'वाचनाचे महत्व' या विषयी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की,आपल्या ध्येयानुसार योग्य पुस्तकांची निवड करून वाचन केले तर स्पर्धेच्या युगात टिकणे सहज शक्य होईल. त्यामुळे ध्येय निश्चित करा व त्यानुसार पायरी पायरीने मार्गक्रमण करा. समारोप सत्रात कार्यशाळेत घेण्यात आलेल्या चित्र पाहून सादरीकरण या स्पर्धेत यश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मा. शशिकांत धामणे, शिवाजी पवार,आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित केले.

# वाचन संस्कृती आणि आजीवन शिक्षण (महाविद्यालय गट)

का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहार आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी २८ नोव्हेंबर २०२५ रोजी "वाचन संस्कृती आणि आजीवन शिक्षण" या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे प्रास्ताविक वैशाली सोनगिरे यांनी केले.



या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.डॉ. आशिष पानट यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा सदस्य कबचौ उमवी जळगावचे नितीन ठाकूर उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमात संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आशिष पानट यांच्या “वाचन व लेखन : काल, आज आणि उद्या” या विषयावरील मार्गदर्शनाने झाली. मानवसंस्कृतीच्या प्रारंभी संवादासाठी चित्रभाषेचा वापर केला जात. काळानुसार लेखनाची साधने बदलत गेली -माध्यमे व लिपी बदलली तरी भाषा टिकून राहिली, लिपी हरवली तरी भाषा जिवंत राहू शकते यासाठी संस्कृत व इजिप्शियन भाषेचे उदाहरण दिले. त्यामुळे भाषा व लिपी जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्या नंतर प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांनी वाचनातून शब्दसंपदा आणि अभिव्यक्तीचा विकास कसा करता येतो याबाबत मार्गदर्शन केले त्यात, वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती व बौद्धिक विकास होतो, शब्दसंपदा वाढते व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते.



**प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी वाचनाची सवय कशी लावावी यावर मार्गदर्शन केले त्यात त्या म्हणाल्या. ‘वाचन ही एक कला’ असून जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. लहान वयात हलकीफुलकी पुस्तके, गोष्टी, चरित्रे यांपासून वाचनाची सुरुवात करावी. डिजिटल युगातही पुस्तक वाचनावर भर द्यावा. वाचन गट, चर्चा, पुस्तकांचे सारांश लेखन यामुळे वाचनाची आवड वाढते. प्रा. उषा पाटील यांनी काय वाचावे व कसे वाचावे या विषयी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी विज्ञान कथा व शास्त्रज्ञांची चरित्रे वाचावीत.थोर व्यक्तींची चरित्रे व आत्मचरित्रे प्रेरणादायी ठरतात. वर्तमानपत्रे, संपादकीय लेख, दिवाळी अंक, प्रवासवर्णने वाचावीत. वाचन हे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी योग्य दिशा देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.**



कार्यशाळेत घेण्यात आलेल्या मी वाचलेले पुस्तक या उत्स्फूर्त सादरीकरण स्पर्धेत यश मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी बक्षीस देऊन सन्मानित केले. सादरीकरण स्पर्धेसाठी एकूण 22 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे परीक्षण डॉ. मानसी पानट, डॉ. आशिष पानट यांनी केले.



# रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे विविध शाळेत गणित सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा.

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहारतर्फे २२ डिसेंबर रोजी राष्ट्रीय गणितदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून विविध शाळांमध्ये गणित सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहात नामवंत गणितज्ज्ञ व शिक्षकांची विविध विषयांवरील व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

गणित सप्ताहाचा उद्घाटन कार्यक्रम १५ डिसेंबर रोजी जयहिंद हायस्कूल येथे झाला. प्रा. डॉ. एम. एम. पवार यांनी “भाषेचे गणित व गणिताची भाषा” या विषयावर मार्गदर्शन करत गणितातील भाषेचे महत्त्व स्पष्ट केले. १६ डिसेंबर रोजी नानासाहेब झेंड. बी. पाटील हायस्कूल येथे प्रा. दीपक चौधरी यांनी “गणितातील ट्रिक्स आणि टेक्निक्स” या विषयावर व्याख्यान दिले. १७ डिसेंबर  रोजी यशवंत विनयन हायस्कूल येथे “वैदिक गणित” या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.




१८ डिसेंबर रोजी अग्रसेन हायस्कूल येथे मा. श्री. दिनेश बागुल यांनी “पाढ्यांची गंमत” या विषयावर विद्यार्थ्यांना रंजक पद्धतीने मार्गदर्शन केले. १९ डिसेंबर* रोजी कमलाबाई शंकरलाल कन्या हायस्कूल येथे श्री. एन. एम. जोशी यांनी “कृतीतून गणित” या विषयावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. २० डिसेंबर* रोजी सिस्टेल इंग्लिश मीडियम हायस्कूल येथे मा. व्ही. वाय. दाबके यांनी “श्रीनिवास रामानुजन” यांच्या जीवनकार्यावर व्याख्यान दिले.



गणित सप्ताहाचा समारोप २२ डिसेंबर २०२५ रोजी का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सभागृहात झाला. डॉ. आशिष पानट यांच्या “सर्वव्यापी गणित” या विषयावरील व्याख्यानाने समारोप झाला. समारोप समारंभास अध्यक्ष म्हणून डॉ. के. बी. पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. एम. एम. पवार तसेच मा. एस. यु. पाटील मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात डॉ. के. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “गणित हा पाठांतराचा विषय नसून” तो आकलन करण्याचा, विचार करण्याचा आणि त्या विचारातून कृती करण्याचा विषय आहे. संपूर्ण गणित सप्ताह विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.




## गणित दिनानिमित्त अमळनेर येथील शैक्षणिक उपक्रम.

जून २०२६ पासून रेऊ वाणी विज्ञान विहाराची अमळनेर येथे शाखा सुरू करण्याच्या अनुषंगाने वातावरण निर्मितीसाठी रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे अमळनेरमधील विविध शाळांमध्ये गणित दिनानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम शाळेत डॉ. आशिष पानट यांनी वर्गमूळ व पाढे पाठ करण्याच्या सोप्या पद्धती तसेच दैनंदिन जीवनातील गणिताचा उपयोग यावर मार्गदर्शन केले. तर डॉ. एम. एम. पवार यांनी कॅलेंडरची गंमत, गणितातील संख्यांकडे पाहण्याची अनोखी कला व गणितातील भाषेच्या गमती-जमती विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.याशिवाय भगिनी मंडळाच्या हायस्कूलमध्ये सौ. वैशाली सोनगिरी यांनी विद्यार्थ्यांना महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची माहिती देत रामानुजन चौकट, रामानुजन संख्या तसेच वीस नंतरचे पाढे सोप्या पद्धतीने कसे तयार करायचे याचे मार्गदर्शन केले.




## रेऊ वाणी विज्ञान विहारात मराठी व विज्ञान मंडळाचा संयुक्त कार्यक्रम संपन्न

रेऊ वाणी विज्ञान विहार येथे मराठी मंडळ व विज्ञान मंडळाचा संयुक्त कार्यक्रम दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक विभागाचे सचिव मा. डॉ. किरण कुलकर्णी तसेच उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा. प्रमोद पाटील व का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सचिव प्रा.डॉ.शोभा शिंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रमुख अतिथी मा.डॉ. किरण कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना कल्पवृक्षाची गोष्ट सांगत पुस्तक व इंटरनेट हे आधुनिक युगातील ज्ञानाचे कल्पवृक्ष असल्याचे सांगितले. ज्ञानाच्या विविध शाखा या कल्पवृक्षाप्रमाणे विस्तारलेल्या असून विद्यार्थ्यांनी त्याचा जास्तीत जास्त उपयोग करावा, असे प्रतिपादन त्यांनी केले. मराठी मंडळाच्या कार्यक्रमाचे आयोजन या महिन्यात येणाऱ्या साने गुरुजींची जयंती व संत गाडगेबाबांची पुण्यतिथी यानिमित्त करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. डॉ. सुषमा दाते यांनी परमपूज्य साने गुरुजी यांच्या विचारांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



प्रा. डॉ. ज्योती बोरकर यांनी संत गाडगेबाबांच्या कार्यावर मार्गदर्शन करत समाजजागृतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. हातात झाडू घेऊन त्यांनी केवळ परिसर स्वच्छ केला नाही, तर अंधश्रद्धा दूर करत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. यानंतर साने गुरुजी व संत गाडगेबाबांच्या विचारांवर आधारित विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. विज्ञान मंडळाच्या कार्यक्रमात प्रा. डॉ. अजय चांडक यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



कार्यक्रमाच्या शेवटी वक्तृत्त्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा द्वितीय फेरीसाठी विशेष पूर्वतयारी वर्गांचे आयोजन

दिनांक १७ डिसेंबर २०२५ ते २ जानेवारी २०२६ या कालावधीत डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेच्या द्वितीय (प्रयोग) फेरीसाठी विशेष पूर्वतयारी वर्गांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या वर्गांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना प्रयोगात्मक कौशल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन व आत्मविश्वास विकसित करण्यास मदत करणे हा होता. या प्रयोग फेरीसाठी एकूण १८ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रयोगांची सखोल माहिती मिळावी यासाठी वेगवेगळ्या विषयातील तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. प्रत्येक प्राध्यापकांनी आपल्या विषयातील संकल्पना स्पष्ट करत प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पूर्वतयारी दरम्यान विद्यार्थ्यांसाठी एकूण १० सराव परीक्षा घेण्यात आल्या. या सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेचे स्वरूप समजण्यास मदत झाली तसेच वेळ व्यवस्थापन, अचूक निरीक्षण व प्रयोग नोंदणी यांचा सराव झाला.



# बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीत साक्री तालुक्यातील 25 गावातील 62 शाळांमध्ये १४९७० विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ६३२ विद्यार्थ्यांना रेफर करण्यात आले व ७९ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले. रेफर केलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७६ विद्यार्थी शारदा नेत्रालयात येवून गेले. शस्त्रक्रिया सुचविलेल्या पाच विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली.



शाळेतील नियमित नेत्र तपासणी करतांना



नेत्रतपासणी दरम्यान शारदा नेत्रालयात रेफर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५ विद्यार्थ्यांना शस्त्रक्रिया सुचविण्यात आली. त्यापैकी आदिवासी आश्रमशाळा पिंपळनेर येथील राहुल काळू ठाकरे (कोंडाईबारी) या एका विद्यार्थ्याची मोफत शास्त्रक्रिया करण्यात आली.

दिनांक 29.11.2025 रोजी ए. बी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर अंतर्गत वाखारकर नगर धुळे येथे 45 (42 जेष्ठ नागरिक व 3 मुले ) यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान 21 ( 18 जेष्ठ नागरिक व 3 शालेय विद्यार्थी) यांना रेफर करण्यात आले व ७ जेष्ठ नागरिकांना चष्मा नंबर काढून देण्यात आला.



जेष्ठ नागरिकांची तपासणी करतांना

दिनांक १२.११.२०२५ रोजी मा.श्री शशिकांत धामणे यांच्या मार्गदर्शनाखाली सी.ए. फाउंडेशन जळगाव तर्फे जळगाव येथील शेठ लालजी नारायणजी सार्वजनिक माध्यमिक विद्यालयातील १२१७ विद्यार्थ्यांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. तपसणी दरम्यान ३२ विद्यार्थ्यांना पुढील तपासणीसाठी शारदा नेत्रालयात रेफर करण्यात आले व 27 विद्यार्थ्यांना चष्मा नंबर काढून दिला. तसेच विद्यार्थ्यांनी आपला आहार व डोळ्यांची काळजी कशी घ्यायची दृष्टी दोष, कसे ओळखावे याबाबत बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाच्या प्रशासन प्रमुख वैशाली सोनगिरे तर डॉ. दिपाली महाजन यांनी डोळ्यांसाठी आवश्यक असणारा आहार याविषयी स्लाईड शो द्वारे मार्गदर्शन केले.



स्लाईडशो द्वारे मार्गदर्शन करतांना वैशाली सोनगिरे

दिनांक १३.१२.२०२५ रोजी महाराष्ट्र सेवा समितीचे माजी अध्यक्ष मा.श्री.रमेशजी अग्रवाल व सौ. विजय अग्रवाल यांनी प्रकल्पाला भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी विशेषतः ज्या विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया झाली आहे अशा विद्यार्थी, पालक व शिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधला यावेळी विद्यार्थ्यांनी शस्त्रक्रियेपूर्वी असणारी न्यूनगंडता व यशस्वी शस्त्रक्रियेनंतर वाढलेला आत्मविश्वास या बद्दल आपले अनुभव सांगितले. विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून मा. अग्रवाल यांनी आनंद व्यक्त केला.



पालक, शिक्षक व शस्त्रक्रिया झालेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना

दिनांक ११.१२.२०२५ रोजी साक्री तालुक्यातील पिंपळनेर गावातील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय येथे मोफत नेत्रतपासणी सोबतच शाळेतील मुख्याध्यापिका व शिक्षिकांच्या विशेष विनंतीवरून शाळेतील विद्यार्थ्यांनीना ‘मुलगी वयात येतांना’ त्यांच्यात होणाऱ्या शारीरिक व मानसिक बदल तसेच आहार व स्वच्छतेविषयीची काळजी कशी घ्यावी याबाबत डॉ.दिपाली महाजन यांनी मार्गदर्शन केले.



किशोरवयीन विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना

दि.२६.९.२०२५ रोजी साक्री तालुक्यातील नावापाडा येथील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी केली असता तपासणी दरम्यान ज्या विद्यार्थ्यांना दृष्टीदोष आढळून आला त्या विद्यार्थ्यांना प्राचार्य विजय आनंदराव खैरनार यांनी विशेष पुढाकार घेऊन पुढील उपचारासाठी शारदा नेत्रालाय धुळे येथे आणले.




तपासणीसाठी आलेले विद्यार्थी

दिनांक १७.१२.२०२५ ते १९.१२.२०२५ रोजी महाराष्ट्र सेवा समितीचे अध्यक्ष मा.श्री.जीवन कायंदे व सौ सिद्धी कायंदे यांनी प्रकल्पास भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी १३ डिसेंबर २०२५ धुळे तालुक्यातील हेंदरून व मोघन येथील जि.प.शाळा व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली, तपासणी दरम्यान रेफर केलेल्या विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालय धुळे येथे तपासणीसाठी आणण्यात आलेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांची श्री. कायंदे यांनी यावेळी संवाद साधला.






शारदा नेत्रालय येथे तपासणीसाठी आणलेल्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधतांना मा. जीवन कायंदे सर

१९.१२.२०२५ रोजी मा.श्री. जीवन कायंदे यांनी जळगाव येथील कै.सु.ग. देवकर प्राथमिक शाळेत (प्रकल्पाची) विद्यार्थ्यांची नेत्रतपासणीच्या कामाची पाहणी केली. मा. शशिकांत धामणे व कायंदे सर तसेच इतर मान्यवर हस्ते शेठ लालजी नारायणजी सार्वजनिक विद्यालयातील २७ विद्यार्थ्यांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले.









# स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था, पुणे

## ‘सा’ संस्थेचा २८ वा वर्धापनदिन साजरा

१८ डिसेंबर रोजी ‘सा’ संस्थेचा स्थापना दिन ‘फन फेअर’ च्या स्वरूपात साजरा करण्यात आला. या वर्षी संस्था स्थापन होऊन २८ वर्षे पूर्ण झालीत. हा कार्यक्रम ‘सा’ संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला आमच्या शुभार्थींनी तो यशस्वीपणे राबविला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शुभार्थींना पैशांचे व्यवहार हाताळण्याचा अनुभव देणे, आत्मविश्वास वाढवणे तसेच त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा सामावून घेणे हा होता.





## ०६ ते ११ ऑक्टोबर दरम्यान ‘सा’ संस्थेतर्फे मानसिक आरोग्य सप्ताहाचे आयोजन

मानसिक आरोग्य सप्ताहाचे आयोजन करून आठवडाभर विविध उपक्रम राबविण्यात आले त्यात पुण्यातील कात्रज परिसरात पत्रकांचे वितरण करण्यात आले तसेच पहिल्या सत्रात शुभार्थींच्या कलात्मक सादरीकरणांचे आयोजन करण्यात आले. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि सामाजिक सहभागाला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश होता. दुसऱ्या सत्रात नेहा उपाध्ये यांनी मानसिक आरोग्य या विषयावर कीर्तन सादर केले. या कार्यक्रमासाठी शिरीष क्षीरसागर, संजय पंडित आणि सविता पंडित हे विशेष पाहुणे उपस्थित होते. सारिका चांडक आणि आरती पंडित यांनी निरामय व्यसनमुक्ती केंद्राला भेट देऊन माइंडफुलनेस (सजगता) या विषयावर मार्गदर्शन केले.






६ ऑक्टोबर: पुण्यातील कात्रज परिसरात पत्रकांचे वितरण करण्यात

९ ऑक्टोबर: पहिल्या सत्रात शुभार्थींच्या कलात्मक सादरीकरणांचे आयोजन करण्यात आले. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि सामाजिक सहभागाला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश होता. दुसऱ्या सत्रात नेहा उपाध्ये यांनी मानसिक आरोग्य या विषयावर कीर्तन सादर केले. या कार्यक्रमासाठी शिरीष क्षीरसागर, संजय पंडित आणि सविता पंडित हे विशेष पाहुणे उपस्थित होते.





१० ऑक्टोबर: सारिका चांडक आणि आरती पंडित यांनी निरामय व्यसनमुक्ती केंद्राला भेट देऊन माइंडफुलनेस (सजगता) या विषयावर मार्गदर्शन केले.आले.

# शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

SHARDA NETRALAY, DHULE

(Unit of Sundeep Foundation, Mumbai )

**PERFORMANCE SUMMARY OCTOBER - 2025 TO DECEMBER - 2025**

| A | Outpatient visits | | B | Free/Outreach/Paid | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Walk-in Free & Paid** | | 1 | **Free & Outreach** | |
| | New | 9,143 | | Walkin- Free | 460 |
| | Review | 6,679 | | Outreach (screening eye camps) | 256 |
| | Retina OPD | 867 | | Retina | 2 |
| | Pediatrict OPD | 73 | | **Total** | **718** |
| | Express OPD | 491 | 2 | **Paid** | |
| | **Total Walk-in** | **17,253** | | SICS ( Inluding Subsidised ) | 349 |
| 2 | **Vision Center - Chalisgon** | | | PHACO ( Including Subsidised) | 1,238 |
| | New | 674 | | Pediatric | 4 |
| | Review | 226 | | Retina | 32 |
| | Vision Center - Chalisgon Total | **900** | | Others Surgeries & Procedure | 1,003 |
| 3 | **Outreach** | | | **Total** | **2626** |
| | Screening eye camps | 1,278 | | | |
| | **Total Outpatient visits (walk-in+Vision** | **19,431** | | **Free Outreach & Paid Total** | **3,344** |


**का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठान, धुळे**
**विद्यमान विश्वस्तांची यादी**

संस्थापक : स्व.डॉ.जगन्नाथ काशिनाथ वाणी

सीए.श्री.शशिकांत एस. धामणे (अध्यक्ष)

प्रा. डॉ. शोभा प. शिंदे (सचिव)

डॉ. श्री. के. बी. पाटील

श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी

प्रा. डॉ. श्री. एन.एम.जैन

श्री. श्रीपाल तेजराज मुणोत

श्री. विवेक रघुनाथ केले

श्री. जितेंद्र धर्मराज सोनगिरे


**We accept donations from well-wishers**

K.S.Wani Memorial Trust
IDBI Bank, Dhule (Maharashtra)
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483

---------------------------

K.S. Wani Memorial Trust.
FCRA Reg. No. 083820024
Darpan Reg. No. MH/2017/0181729
PAN No. AAATK9380K

---------------------------


**Contact:** K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org



**का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,**
**विद्यमान विश्वस्तांची यादी**

संस्थापक : स्व. डॉ.जगन्नाथ काशिनाथ वाणी

डॉ. श्री. के. बी. पाटील (अध्यक्ष)

प्रा. डॉ. शोभा प. शिंदे (सचिव)

सीए. श्री. शशिकांत एस. धामणे

प्रा. डॉ. श्री. एन.एम.जैन

श्री. श्रीपाल तेजराज मुणोत

श्री. विवेक रघुनाथ केले


